भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/2016-17/251
आयडीएमडी.सीडीडी.क्र. 2347/14.04.051/2016-17 मार्च 16, 2017

अध्यक्ष/सीईओ/व्यवस्थापकीय संचालक,
सर्व प्राधिकृत बँका,
(बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 लागु असलेल्या सर्व बँका)

महोदय/महोदया,

**प्रधान मंत्री गरीब कल्याण ठेव योजना (पीएमजीकेडीएस), 2016 - स्पष्टीकरण**

कृपया, प्रधान मंत्री गरीब कल्याण ठेव योजना (पीएमजीकेडीस), 2016 च्या घोषणेबाबत सरकारने दिलेले पत्र आयडीएमडी.क्र.1451/08.03.016/2016-17 डिसेंबर 16, 2016 आणि आमची अधिसूचना क्र.एस.ओ.4061(ई) दि. डिसेंबर 16, 2016 चा संदर्भ घ्यावा. आमच्या नजरेस आणण्यात आले आहे की, आय कर प्राधिकरणांकडे फॉर्म 5 अपलोड करतेवेळी त्यावर द्यावयाच्या संदर्भ क्रमांकाबाबत, निवेशकांमध्ये स्पष्टता नाही.
सध्या तरी, पीएमजीकेडीएसखाली रकमा स्वीकारताना बँका पोचपावती देतात. त्यानंतर, ह्या ठेवीचा तपशील, ह्या बँकेच्या ई-कुबेर अर्जात भरला जातो व एक ‘सबस्क्रिप्शन पावती’ निर्माण होते. सबस्क्रिप्शन पावती ही सिस्टिम निर्मित पावती असून त्यावर ‘इश्यु रेफरन्स नंबर’ असतो. आय कर प्राधिकरणांकडे फॉर्म 5 अपलोड करण्यापूर्वी, निवेशकांनी हाच संदर्भ क्र. देणे आवश्यक आहे.

ह्यात अधिक स्पष्टता आणण्यासाठी, ई-कुबेरने निर्माण केलेल्या ‘इश्यु रेफरन्स नंबरला’, आता ‘डिपॉझिट रेफरन्स नंबर’ असे नवे नाव देण्यात आले आहे. हा बदल दर्शविण्यासाठी, आरबीआयच्या ई-कुबेर अर्जांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात आले आहेत. पीएमजीकेडीएस खालील स्वीकारकर्त्या बँकांच्या कर्मचा-यांनी आणि पीएमजीकेडीएसच्या, 2016 ठेवीदारांनाही ह्याची नोंद घेण्यास सांगण्यात यावे.

आपला विश्वासु,

(ए.मंगलागिरी)
मुख्य महाव्यवस्थापक

---

अंतर्गत कर्ज व्यवस्थापन विभाग, केंद्रीय कायार्लय, केंद्रीय कायार्लय भवन, शहीद भगत सिंह मार्ग, 23वा मजला, मुंबई - 400 001, भारत फोन : (022) 2266 1602-04, फॅक्स : (022) 22644158, 2270 5125, ई-मेल : cgmidmd@rbi.org.in

सावधानतेचा इशारा : बँक खात्याचा तपशील पासवर्ड ह्यासारखी वैय्यक्तिक माहिती मागविण्याबाबत, आरबीआय, कधीही ईमेल्स, एसएमएस पाठवत नाही किंवा फोन ही करत नाही. आरबीआय, कोणाचा निधी ठेवून घेत नाही किंवा देऊ करत नाही. प्रकारच्या कोणत्याही ऑफर्सना प्रतिसाद देऊ नका.